SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR – 416 004 MAHARASHTRA
Stat Cell : 0231-2609147.
website : www.unishivaji.ac.in
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर – ४१६ ००४ – महाराष्ट्र
सांख्यिकी कक्ष : ०२३१-२६०९१४७.
E-Mail : statcell@unishivaji.ac.in
Estd : 1962
NAAC 'A++' Grade

जा.क्र./शिवाजी वि./सांख्यिकी कक्ष/एआयएसएचई/२०२२-२३/47 दिनांक : 22/02/2024

## स्मरणपत्र क्रमांक २

प्रति,
मा. प्राचार्य / संचालक,
सर्व संलग्नीत महाविद्यालये / मान्यता प्राप्त संस्था
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

**विषय : अखिल भारतीय उच्च शिक्षण सर्वेक्षण कार्यक्रम सन २०२२-२३**
Web DCF मध्ये माहिती भरण्याबाबत...

**संदर्भ :** १) जा.क्र./शिवाजी वि./सांख्यिकी कक्ष/एआयएसएचई/२०२२-२३/४६, दि. १५/०२/२०२४ रोजीचे या कक्षाचे स्मरणपत्र क्रमांक १.
२) जा.क्र./शिवाजी वि./सांख्यिकी कक्ष/एआयएसएचई/२०२२-२३/४०, दि. २३/०१/२०२४ रोजीचे या कक्षाचे परिपत्रक.
३) मा. डॉ. शैलेंद्र देवळाणकर, शिक्षण संचालक (उच्च शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे क्रं. उशिसं/सांख्यिकी/एआयएसएचई/२०२२-२३ दि.२६/११/२०२२ रोजीचे पत्र.

महोदय/महोदया,

उपरोक्त विषयास अनुसरून आपणास आदेशान्वये कळविण्यात येते की, मानव संसाधन विकास मंत्रालय, नवी दिल्ली यांनी अखिल भारतीय उच्च शिक्षण सर्वेक्षण कार्यक्रम २०२२-२३ वेबपोर्टलवर माहिती नोंद करण्याबाबत कळविलेले आहे. सदर वेबपोर्टलवर (www.aishe.gov.in) माहिती नोंद करण्याची सुरवात दिनांक ०५/०१/२०२४ पासुन झालेली आहे. या अनुषंगाने विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालयांनी आपली प्रशासकीय, शैक्षणिक, व शैक्षणिकेत्तर बाबींची सन २०२२-२३ करीता माहिती नोंद करावयाची आहे. सदरची माहिती दिनांक १५/०२/२०२४ व दिनांक २०/०२/२०२४ पर्यंत माहिती नोंदणीचे काम संलग्नित महाविद्यालयांच्या नोडल अधिकारी यांनी निश्चितपणे पूर्ण करण्याबाबत उपरोक्त संदर्भ क्रमांक १ व २ अन्वये आपल्याला कळविण्यात आलेले होते.

सदर माहितीचा आढावा घेतला असता आपल्या महाविद्यालयाची माहिती वेबपोर्टलवर अद्याप नोंद केलेली दिसुन येत नाही. **सदर माहिती दि. २६/०२/२०२४ पर्यंत नोंद न केल्यास** आपले महाविद्यालय अखिल भारतीय उच्च शिक्षण सर्वेक्षण कार्यक्रम (AISHE) या वेबपोर्टलवर माहिती नोंद न करणाऱ्या महाविद्यालयांच्या यादीत समाविष्ट करण्यात येईल. **असे झाल्यास शिष्यवृत्ती बाबतचे कोणतेही काम होणार नाही तसेच NAAC ला सामोरे जाण्यास आपल्या महाविद्यालयास अडचणी उद्भवतील.** वेबपोर्टलवर माहिती नोंद न केल्यास होणाऱ्या सर्व कार्यवाहीस आपले महाविद्यालय जबाबदार असेल याची कृपया आपण नोंद घ्यावी.

**वेबपोर्टलवर माहिती नोंद करत असता काही अडचण निर्माण झाल्यास महाविद्यालयांच्या नोडल अधिकारी यांनी सांख्यिकी कक्ष, खोली क्रमांक ३१३, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर. दुरध्वनी क्रमांक ०२३१-२६०९१४७ येथे संपर्क साधावा.**

कळावे.

आपला विश्वासू,

कुलसचिव